दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

भंडार
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

खाण-क्रशरविरोधी लढ्याचा पहिला टप्पा यशस्वी

लेखी आश्वासनांनंतर आमरण उपोषण स्थगित; ग्रामस्थांचा संघर्ष मात्र कायम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वडझरी बु. परिसरात सुरू असलेल्या खाणकाम, ब्लास्टिंग आणि स्टोन क्रेशरमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांच्या लढ्याला पहिल्या टप्प्यात यश मिळाले आहे. प्रशासन, ग्रामस्थ आणि संबंधित कंपनी यांच्यात झालेल्या चर्चेनंतर लेखी आश्वासने देण्यात आल्याने १ जूनपासून सुरू असलेले आमरण उपोषण स्थगित करण्यात आले. मात्र आश्वासनांची अंमलबजावणी न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

वडझरी परिसरात सुरू असलेल्या खाणकाम, ब्लास्टिंग आणि स्टोन क्रशरमुळे मोठ्या प्रमाणात धूळ, आवाज व प्रदूषणाचा त्रास होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. वारंवार होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे अनेक घरांना तडे गेल्याचा, विहिरी व बोअरवेलच्या पाण्यावर परिणाम झाल्याचा तसेच शेती आणि जनावरांचे नुकसान झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

याबाबत ग्रामस्थांनी ग्रामपंचायत, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अनेक वेळा निवेदने दिली होती. मात्र ठोस कारवाई होत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. ग्रामस्थांनी १ जून रोजी गावात आमरण उपोषण सुरू केले. अवैध खाणकाम बंद करणे, स्टोन क्रेशरमुळे होणारे प्रदूषण रोखणे, नुकसानग्रस्तांना भरपाई देणे आणि संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे या प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या होत्या. उपोषणाला परिसरातील नागरिक, शेतकरी संघटना, विविध सामाजिक संघटना आणि पत्रकारांनी पाठिंबा दर्शविला. सोशल मीडियावरही या आंदोलनाची मोठ्या प्रमाणात चर्चा झाली.

आंदोलन तीव्र होताच तहसील प्रशासनाने या प्रश्नाची दखल घेतली. तहसीलदारांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला पत्र पाठवून खाणकाम, ब्लास्टिंग आणि क्रेशरमुळे होत असलेल्या त्रासाची चौकशी करण्याचे निर्देश दिले. तसेच ग्रामपंचायतीनेही संबंधित खाण आणि क्रेशरविरोधात नोटीस बजावल्याचे समोर आले. उपोषणाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन, ग्रामस्थ आणि श्रावणी कन्स्ट्रक्शन यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा होऊन लेखी बंधपत्र तयार करण्यात आले.

बंधपत्रातील प्रमुख मुद्दे पुढील प्रमाणे - खाणकामामुळे बाधित झालेल्या घरांची, विहिरींची, बोअरवेलची आणि गोठ्यांची पाहणी करून नुकसानभरपाई देणे. बंद पडलेले पाणी स्रोत पूर्ववत सुरू करण्यासाठी उपाययोजना करणे. भविष्यात ब्लास्टिंग करताना आवश्यक ती खबरदारी घेणे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कारवाई करणे. धूळ, आवाज आणि प्रदूषणाच्या परिणामांची तपासणी करणे. संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे. गायरान जमिनीवरील कथित अवैध खाणकामाची चौकशी करणे.

लेखी आश्वासनांनंतर आंदोलनकर्त्यांनी आमरण उपोषण स्थगित केले असले, तरी ग्रामस्थांनी संघर्ष कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आश्वासनांची वेळेत अंमलबजावणी न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

उपोषणाच्या काळात ग्रामस्थांनी दाखविलेली एकजूट, महिलांचा सहभाग ही आंदोलनाची मोठी ताकद ठरली. या संघर्षामुळे प्रशासनालाही प्रश्न गांभीर्याने घ्यावा लागला. उपोषण स्थगित झाले असले तरी वडझरीतील खाण-क्रेशरचा प्रश्न अद्याप निकाली निघालेला नाही. लेखी बंधपत्रातील आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते की नाही, याकडे आता संपूर्ण संगमनेर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आम्ही सर्वजण आपले सदैव ऋणी आहोत

आमचे आधारस्तंभ व दैनिक युवावार्ता, साप्ताहिक संगम संस्कृती वृत्तपत्राचे संपादक आदरणीय किसन भाऊ हासे व संपादिका सौ. सुशीलाताई किसन हासे यांचे वाढदिवसानिमित्त फोन द्वारे, मेसेज द्वारे, प्रत्यक्ष भेटून अनेक मान्यवरांनी शुभेच्छा व्यक्त केली. दैनिक युवावार्ता परिवारावर प्रेम करणाऱ्या व शुभेच्छा व्यक्त करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आम्ही सदैव ऋणी आहोत. पुढील काळातही आपले प्रेम असेच राहावे अशी प्रार्थना व सर्वांचे मनःपूर्वक आभार.

दैनिक युवावार्ता परिवार, सर्व सदस्य, युवा उद्योग समूह संगमनेर

महिनाभरातच उखडला लाखोंचा दगडी रस्ता

दोषींवर कारवाईची युवासेनेची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील प्रभाग क्रमांक १३ व १४ मधील शनि मंदिरासमोर अवघ्या महिनाभरापूर्वी लाखो रुपयांचा खर्च करून तयार करण्यात आलेला दगडी रस्ता निकृष्ट दर्जाच्या कामामुळे उखडू लागल्याचा गंभीर आरोप युवासेनेने केला आहे. या प्रकरणी संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकून कडक कारवाई करावी, तसेच रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी युवासेना विधानसभा प्रमुख अमोल डुकरे यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शनि मंदिर परिसरात नव्याने बांधण्यात आलेल्या दगडी रस्त्यावरील दगड अवघ्या एका महिन्यातच मोकळे होऊन बाहेर येत आहेत. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांच्या कररूपाने जमा झालेल्या पैशांची उधळपट्टी झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

शनि मंदिर परिसर हा शहरातील गजबजलेला भाग असून येथे ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी व भाविकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. रस्त्यावरील उखडलेल्या दगडांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून एखादी गंभीर दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे होण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. युवासेनेने नगरपरिषद प्रशासनाकडे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये संबंधित कंत्राटदाराच्या खर्चाने रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करणे, दोषी कंत्राटदारास काळ्या यादीत टाकून कायदेशीर कारवाई करणे आणि संपूर्ण कामाचे तांत्रिक ऑडिट करून जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करणे यांचा समावेश आहे. दरम्यान, या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही युवासेना विधानसभा प्रमुख अमोल डुकरे यांनी दिला आहे. त्यामुळे या प्रकरणात नगरपरिषद प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता-
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
• डायलिसीस विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
• हृदयरोग विभाग • मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
• जॉईंट रिप्लेसमेंट • स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25